**MHKO120001452015**

<ins>नियमित दिवाणी दावा क्र.३२/२०१५</ins>

(CNR No.MHKO120001452015)

## <ins>निशाणी क्र.१०८ खाली आदेश</ins>

वादी यांनी प्रस्तुत अर्ज दाखल करुन प्रतिवादी क्र.१५ यांचे समन्स त्यांचे राहते घराचे दर्शनी भागावर समन्स चिकटवुन लागु करणेची विनंती केली आहे.

०२. वादी यांच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र.१५ यांचे समन्स वारंवार पाठवुनसुध्दा त्या समन्स लागु करुन घेत नाही. सबब प्रतिवादी क्र.१५ यांचे समन्स दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम २० (१) प्रमाणे त्यांचे राहते घराचे दर्शनी भागावर चिकटवुन लागु करणेची विनंती केली आहे.

०३. वादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले.

०४. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने निशाणी क्र.१०६ वरील बेलीफ रिपोर्ट चे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१५ यांनी सदर समन्स हे त्यांचे आडनांव चुकीचे नमुद केल्यामुळे स्विकारलेले नाही. अशा परिस्थितीत वादी यांनी समन्स बजावणीकरीता योग्य त्या स्टेप्स घेणे आवश्यक आहे. सबब वादी यांच्या मागणीप्रमाणे प्रतिवादी क्र.१५ यांचे राहते घराचे दर्शनी भागावर समन्स चिकटवुन लागु करणेबाबत आदेश पारीत करणे न्यायोचित होणार नाही. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

## <ins>आदेश</ins>

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2023.11.06 15:16:45 +0530

( व्ही.बी.मुल्ला )

दि.०६/११/२०२३

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
गारगोटी